**<u>आर.सी.सी.क्र.१०५०/२०२३</u>**
**<u>नि.१३</u>**

**सरकारतर्फे सा.क्र. १**

मी या व्दारे सत्य प्रतिज्ञेवर निवेदन करते की,
माझे नांव : स्नेहल शाम भोसले,
वय : ३२ वर्षे, धंदा : सध्या काही नाही
राहणार : केडगाव, ता.जि.अहमदनगर.

**<u>सरतपास सरकार तर्फे ॲड.ए. व्ही. बाबर यांचे मार्फत</u>** -

१. माझे लग्न दि.०१.१२.२०१९ रोजी आरोपी शाम राजेंद्र भोसले याचेसोबत हिंदु धर्माप्रमाणे जय मल्हार लॉन्स, केडगाव येथे झाले आहे. लग्नानंतर मी आरोपीच्या घ ारी केडगाव येथे गेले. माझे सासरी माझे पती शाम, सासरे राजेंद्र, सासु विजया, दीर राहुल, जाउ पुजा उर्फ स्नेहल भोसले असे राहत होतो. लग्नानंतर काही दिवसांनी कोरोणा महामारी सुरू झाली त्यामुळे मी सासरी केडगाव येथे एक वर्षेभर राहिले. त्यावेळी आरोपी पती शाम याचे वर्क फ्रॉम होम सुरू होते. त्यानंतर पती शाम याने मला पुणे येथे डांगे चौकात भाडयाने फ्लॅट घेवुन राहण्यास नेले. त्यावेळी मी पती शाम याचा मोबाईल पाहीला असता त्याचे दुस-या महिलेसोबत संबंध असल्याचे दिसुन आले. त्यानंतर आमच्यात वाद विवाद सुरू झाले. त्यावेळी मी पती शाम यास विचारले की, तुमचे पुर्वी संबंध होते तर मला का फसवले. आरोपी पती शाम म्हटले की घरच्यांसाठी व हुंडयासाठी तेझेसोबत लग्न केले. आरोपी पती शाम मला म्हणत असे की, तुला पुण्यात माझेसोबत राहायचे असेल तर फ्लॅट घेण्यासाठी तुझे वडीलांकडुन रूपये १० लाख घेवुन ये. लग्नात वडीलांनी सहा तोळे सोने व लग्न खर्च करून लग्न करून दिले होते त्यामुळे १० लाख रूपये देवु शकत नव्हते. पती शाम हे म्हटले की, तुला कोर्टात जायचे असेल तर जा. सासु विजया राजेंद्र भोसले हे म्हटले की, माझी मोठी सुन कोर्टात नोकरीला आहे तुला जायचे असेल तर कोर्टात जा. दि. ०३.०९.२०२२ रोजी मी भरोसा सेल येथे तक्रार केली. भरोसा सेल येथे बैठक होवुन तडजोडीचे प्रयत्न झाले परंतु पतीने मला नांदवण्यास नकार दिला. त्यानंतर मी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. आता मला दाखवलेली फिर्यादी तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.१४</u>** देण्यात आला.

२. लग्नानंतर मी पतीच्या घरी केडगाव येथे राहत असताना त्यांनी मला द

ाराशेजारचे गाळा येथे मला राहण्यास सांगितले. तेथे मी राहिले. सदर गाळा या ठिकाणी नैसर्गिक आवश्यक सुविधा नव्हती. माझे सासरचे लोकांना त्रास होईल म्हणुन त्यांनी माझे संध्याकाळचे जेवण बंद केले होते. पुणे येथे पतीसोबत राहत असताना दर शुक्रवारी पती हे दारू पित असे व शिवीगाळ करून मारहाण करायचे.

**(विद्वान सरकारी वकिल यांच्या तोंडी विनंतीवरून सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब)**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

SONAWANE KRUSHNA MURLIDHAR

Digitally signed by SONAWANE KRUSHNA MURLIDHAR
DN: cn=SONAWANE KRUSHNA MURLIDHAR, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6950705, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2025.11.20 15:42:38 +0530

**( के. एम. सोनवणे )**

दिनांक : २०/११/२०२५

अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी
न्यायालय क्र.१६, अहमदनगर